हिंदु ऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दखाखाना

# कंत्राटी पदभरती सविस्तर जाहिरात

अर्ज कालावधी दि.२९/०१/२०२४ ते दि.०६/०२/२०२४

हिंदु ऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दखाखाना अंतर्गत कोल्हापूर जिल्हयामध्ये महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्राअंतर्गत खालील प्रमाणे कंत्राटी पध्दतीने पदे भरावयाची आहेत.

| अ. क्र. | पदाचेनाव | सामाजिक आरक्षण | एकुण भरावयाची पद संख्या | शैक्षणिक अर्हता | दरमहा मानधन | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | लागु नाही | ५ | एम.बी.बी.एस. उत्तीर्ण | रु.६०,००० | आजरा, चंदगड, कागल, हुपरी, शाहुवाडी |
| २ | स्टाफ नर्स | अ.जा .- ३<br>अ.ज. -१<br>वि.जा.अ. -१<br>भ.ज.(ब) - १<br>भ.ज.(क) - १<br>भ.ज.(ड) - १<br>इ.मा.व. - ३<br>आ.दु.घ - २<br>खुला - ४ | १७ | जीएनएम / बीएससी नर्सिंग | रु.२०,००० | जिल्हा शल्य चिकित्सक (म.न.पा. क्षेत्र) (पदसंख्या-१२)<br>आजरा, चंदगड, कागल, हुपरी व गडहिंग्लज (पदसंख्या-५) |
| २ | बहुददेशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) | अ.जा .- १<br>अ.ज. -१<br>वि.जा.अ. -१<br>भ.ज.(ब) - १<br>भ.ज.(क) - १<br>भ.ज.(ड) - १<br>इ.मा.व. - ४<br>आ.दु.घ - २<br>खुला - ५ | १७ | १२ वी विज्ञान शाखा उत्तीर्ण व<br>सॅनिटरी इन्स्पेक्टर कोर्स उत्तीर्ण | रु.१८,०००/- | जिल्हा शल्य चिकित्सक (म.न.पा. क्षेत्र) (पदसंख्या-१२)<br>आजरा, चंदगड, कागल, हुपरी व कुरुंदवाड (पदसंख्या - ५) |

## अटी व शर्ती

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२) सदरची पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकारी राहणार नाही.

३) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) जाहिराती मधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.कोल्हापूर यांनी राखुन ठेवले आहेत.

५) केवळ शासकीय अनुभव ग्राहय धरणेत येईल.

६) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.

७) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे राहील.

८) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्ये नुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येऊन गुणवत्ते नुसार निवड करण्यात येईल.

९) उमेदवारास कंत्राटी कालावधीत सोईनूसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१०) उपरोक्त पदांकरीता तत्सम कौन्सिलचे अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

११) भरती प्रक्रिया स्थगित करणे / रदद करणे / पद भरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकरी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१२) **इच्छुक उमेदवारांचे विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्य प्रतीसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, २ रा मजला, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर येथे दि.२९/०१/२०२४ ते दि.०६/०२/२०२४ रोजीपर्यंत (कार्यालयीन सुट्टी वगळता) कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा.पर्यंत स्विकारण्यात येतील.**

१३) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर एक वर्षाच्या आत एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमूळे पद रिक्त झालेस प्रतीक्षा यादी वरील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जाईल.

१४) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी **रु.१५०/- चा** डिमांड ड्राप्ट व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी **रु.१००/- चा** डिमांड ड्राप्ट (DD) जोडणेआवश्यक/ अनिवार्य आहे व डिमांड ड्राप्टच्या मागे स्वतःचे नाव व पद स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांड ड्राप्ट (DD)

**District Integrated Health & Family Welfare Society, Kolhapur**

या नावाने देय असलेला असावा. चेक/धनादेश अथवा बॅंकेत पैसे भरलेची स्लिप ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१५) डीडी च्या मागे उमेदवाराचे नाव व पदाचे नाव लिहावे.

१६) परिपुर्ण अर्ज सादर करणेची जबाबदारी संबधित उमेदवाराची असुन अपुर्ण अर्ज ग्राहय धरला जाणार नाही, अपात्र करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१७) सदरहू भरती प्रक्रियेकरीता अर्ज सादर करणेची मुदत दि.०६/०२/२०२४ अखेर राहणार असून तदनंतर अर्जाची छाननी, लेखी परिक्षा /मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती / आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रीतसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कडील प्राप्त मार्गदर्शक सुचनां नुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेत येईल. याबाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या https://www.zpkolhapur.gov.in/barti-2019/ संकेतस्थळावर (Website) प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली जाणार नाही.

** खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जा सोबत जोडाव्यात.

१) शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (अनिवार्य) २) शाळा सोडल्याचा /जन्म तारखेचा दाखला ३) प्रमाणित केलेले केवळ शासकीय अनुभव प्रमाणपत्रे ४) पासपोर्ट आकाराचा फोटो

सही/-
सदस्य-सचिव
निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

सही/-
अध्यक्ष
निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

# राष्ट्रीय आरोग्य अभियान कोल्हापूर

अर्ज कालावधी दि.२९/०१/२०२४ ते दि.०६/०२/२०२४

................................ या पदासाठी अर्ज

पासपोर्ट
आकाराचा
उमेदवाराचा
नजीकचा
साक्षांकित फोटो

(फोटोवर उमेदवारांची स्वाक्षरी)

प्रति,
मा.जिल्हा आरोग्य अधिकारीसो,
जिल्हा परिषद कोल्हापूर

संपूर्ण नाव मराठी इंग्रजी (कॅपीटल लेटर)

१) आडनाव ................... ..............................
२) स्वतःचे नाव ................... ..............................
३) वडिलांचे /पतीचेनाव ................... ..............................
४) आईचेनाव ................... ..............................

पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिनकोड सहीत

....................................................................

....................................................................

..................................................पिनकोड-

मोबाईल क्रमांक ................................ईमेल आयडी-................................

५) जन्म तारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

६) दि. ३१/०१/२०२४ रोजीचे वय

| वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

७) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे (√) अशी खुन करावी.

| अ.जा. | अ.ज | वि.जा.अ | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एसईबीसी | आर्थिकमागासप्र वर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | SEBC | EWS | Open |
| | | | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | उत्तीण केलेली परीक्षा | परीक्षा उत्तीर्ण वर्ष | परिक्षेचे एकुण गुण | प्राप्त गुण गुणपत्रक जोडणे आवश्यक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० वी | | | | |
| २ | १२ वी शाखा ...................... | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

९) अनुभव

| अ. क्र. | संस्थेचेनाव व पत्ता | कालावधी | | एकुण कालावधी दिवस महिने वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१०) माझे विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे / नाही असल्यास थोडक्यात तपशिल.....................................

.........................................................................................................

११) अर्जा सोबत खालील (छायांकित) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

१) शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (बंधनकारक) २) जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा /जन्म तारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले केवळ शासकीय अनुभव प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचा फोटो ६) महाराष्ट्र कौन्सिलचे वैध रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.

१२) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय/ नाही.

मी असे प्रमाणित करतो / करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशी रकारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : अर्जदाराची सही :

दिनांक : अर्जदाराचे नाव : (................................................)